इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती/भटक्या जमाती,धनगर, बंजारीसह व विशेष मागास प्रवर्गाच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती प्रदान करणे

# महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य,व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक इबीसी-२००३/प्र.क्र.४१७/मावक-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३१ मार्च,२००५

वाचा :- १) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक इबीसी-१०९४/३२०३८/प्र.क्र.९०/मावक-२, दि.१२/१/९६.

(२)

प्रस्तावना :- मागासवर्गीय मुलींमध्ये ( अनुसूचित जाती, विमुक्त जाती / भटक्या जमाती, धनगर, बंजारीसह व विशेष मागास प्रवर्ग ) प्राथमिक शाळांमध्ये गळतीचे प्रमाण अधिक आढळून येते. या गळतीच्या कारणांची मिमांसा करता असे दिसून येते की, मुलींचे पालक शहरी व ग्रामीण भागातील असून त्यांना रोजगार करण्यासाठी बाहेर जावे लागते. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे पालक मुलींना रोजगारासाठी मदत होईल म्हणून शेतावर व इतरत्र कामावर घेऊन जातात. परिणामी सदर गळतीचे प्रमाण असते दिसून येते. त्यामुळे मुलींना शिक्षण देण्याची प्रवृत्ती पालकांमध्ये नसते. ही मुलींची गळती रोखण्याच्या दृष्टीकोनातून शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक इबीसी-१०९४/३२०३८/प्र.क्र.९०/मावक-२, दि.१२/१/९६ अन्वये इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय मुलींना दरमहा रु.३० ( फक्त १० महिन्यांकरीता )शिष्यवृत्ती देण्यात येते. या शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करणे तसेच योजनेच्या नावात बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :- याबाबत विचार करुन इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय मुलींना ( अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, धनगर, बंजारीसह व विशेष मागास प्रवर्ग ) देण्यात येणाऱ्या दरमहा रु.३०/- या शिष्यवृत्तीच्या रकमेमध्ये वाढ करुन ती दरमहा रु.६०/- प्रमाणे देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

१. योजनेच्या नावात पुढीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे. "इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती प्रदान करणे."

२. योजनेची नियमावली सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये देण्यात आली आहे.

समाज कल्याण विभाग
जिल्हा परिषद, कोल्हापूर.

C:\Documents and Settings\Admin\Desktop\...

मागासवर्ग यांचे कल्याण ०१ - अनुसूचित जातींचे कल्याण- २५६७ शिक्षण, जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदाने स्थानिक क्षेत्र, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०८) (०२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १८७ अन्वये जिल्हा परिषदांना योजनांतर्गत अनुदाने (२२२५ ०५४ ८) (वि.घ.यो.), ४१ सहाय्यक अनुदान (अर्थोपाय अग्रीमाशी समायोजन)" व "२२२५- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण ०३ - मागासवर्गीयांचे कल्याण - २५६७ शिक्षण, जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदाने, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०३) (०१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १८७ अन्वये सहाय्यक अनुदाने (२२२५ ०८९ ८) अर्थोपाय अग्रिमाशी समायोजन, ४१ सहाय्यक अनुदाने" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येवून हा खर्च यासाठी प्रतिवर्षी करण्यात येणाऱ्या मंजूर तरतुदींमधून भागविण्यात यावा.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक : १०९/०५/ व्यय-१४, दिनांक २१/०२/२००५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(र. पां. शिलवंत)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
संचालक, समाज कल्याण , महाराष्ट्र राज्य , पुणे (५ प्रती )
संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र संचालनालय , महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती )
सर्व विभागीय समाज कल्याण अधिकारी
सर्व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी
सर्व समाज कल्याण अधिकारी (गट-अ), जिल्हा परिषद,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखापरीक्षा / लेखा अनुज्ञेयता ), मुंबई / नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१ कक्ष अधिकारी ( बीपुडी-५/व्यय-१४/अर्थोपाय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२ अवर सचिव (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
अवर सचिव (मावक-३), सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
३ कक्ष अधिकारी (विघयो-१),सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती . मावक-२
४

<u>परिशिष्ट "अ"</u>

शासन निर्णय क्रमांक इबीसी-२००३/प्र.क्र.४१६/मावक-२, दिनांक ३१ मार्च,२००५

<u>शिष्यवृत्ती योजनेची नियमावली</u>

१ ही शिष्यवृत्ती योजना मान्यताप्राप्त शाळांतील इयत्ता ५ वी ते ७ वी च्या वर्गामध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय (अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, धनगर, वंजारीसह व विशेष मागास प्रवर्ग ) मुलींसाठी आहे.

२ ही योजना सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षापासून अंमलात येईल.

३ ही योजना गुणवत्ता शिष्यवृत्ती व्यतिरिक्त राहील.

४ या शिष्यवृत्तीसाठी मागासवर्गीय ( अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, धनगर, वंजारीसह व विशेष मागास प्रवर्ग ) मुलींना उत्पन्नाची किंवा गुणांची अट राहणार नाही.

५ ही शिष्यवृत्ती इयत्ता ५ वी ते ७ वी या वर्गामध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय ( अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, धनगर, वंजारीसह व विशेष मागास प्रवर्ग ) मुलींना दरमहा रु.६०/- (रुपये साठ फक्त) १० महिने याप्रमाणे मंजूर करण्यात येईल.

६ ही शिष्यवृत्ती दरवर्षी शैक्षणिक वर्षाच्या कालमर्यादेपूर्वीच म्हणजे जून ते मार्च या १० महिन्यांसाठी मंजूर करण्यात येईल.

७ ही शिष्यवृत्ती मिळण्यासाठी मागासवर्गीय ( अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, धनगर, वंजारीसह व विशेष मागास प्रवर्ग ) मुलींना अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

८ ही शिष्यवृत्ती मंजूर करण्यासाठी सर्व मान्यताप्राप्त शाळांमधून मागासवर्गीय ( अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, धनगर, वंजारीसह व विशेष मागास प्रवर्ग ) मुलींची माहिती मागविण्यात येईल.

९ सदरहू शिष्यवृत्ती समाज कल्याण अधिकारी गट-अ, जिल्हा परिषद मंजूर करतील.